**शासकिय कर्मचा-यांना वैद्यकिय सुविधा**
हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया व रक्ताचा कर्करोग यावरील औषधोपचार, किंमती औषधे, उपकरणे इत्यादीसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी मिळणा-या कमाल रु.४५,००० अग्रीमाची मर्यादा रु.७५,००० पर्यंत वाढविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमएजी १०९५/सीआर ४५/आरोग्य-७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
**दिनांक: १५ नोव्हेंबर, १९९७**

वाचा - १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग ,
क्रमांक एमएजी १०८३/४११९/पीएच-९अ,दिनांक २७ ऑगस्ट,१९८४
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग ,
क्रमांक एमएजी १०८४/४१५७/सीआर१५६/पीएच ९अ,दिनांक २९एप्रिल,१९८५
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग ,
क्रमांक एमएजी १०८३/४११९/पीएच-९, दिनांक २१ ऑगस्ट, १९८५
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग ,
क्रमांक एमएजी १०८८/३८३७/आरोग्य-९, दिनांक २३ जानेवारी, १९८९.

शासन निर्णय - शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०८३/४११९/पीएच-९, दिनांक २१ ऑगस्ट, १९८५ अन्वये संदर्भित अनुक्रमांक २ व ४ येथिल शासन निर्णयानुसार खालील नमूद केलेल्या पाच गंभीर आजारावरील विशिष्टोपचार करुन घेण्यास शासनाने मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयातील किंमती औषधे, उपकरणे, औषधोपचार यावरील संभाव्य खर्च भागविण्यासाठी अनुज्ञेय ठरविलेल्या कमाल रुपये ४५,००० अग्रीमाची मर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे
२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया
३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया
४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया
५) रक्ताचा कर्करोग

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी. 6 APR 1998

उपरोक्त पाच गंभीर आजारावर शासकिय/शासन मान्यता प्राप्त खाजगी रुग्णालयात विशिष्टोपचार करण्यासाठी लागणा-या उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यावरील संभाव्य खर्च भागविण्यासाठी उपरोक्त शासन निर्णय, दिनांक २१

ऑगस्ट, १९८५ नुसार सध्या अस्तित्वात असलेल्या रुपये ४५००० इतक्या अग्रीमाची कमाल मर्यादा रुपये ७५,००० पर्यंत वाढविण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

३. अग्रिम मंजूर करण्याबाबतचे सर्वसाधारण सुधारित नियम या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दिलेले आहेत. या नियमातील तरतुदीनुसार अग्रिम मंजूर करण्यापूर्वी प्रस्तावाची सखोल छाननी करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचा-यांच्या नियंत्रक अधिका-याची राहील.

४. हे आदेश, शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील व त्या दिवसापर्यंत प्रलंबित प्रकरणांना लागू रहातील. यापूर्वी निर्णित झालेल्या प्रकरणी उर्वरित अग्रिम मंजूर करण्याचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक, ८९३/सेवा-५, दिनांक २९ ऑक्टोबर, १९९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मं. सु. यादव

( मंगला सु. यादव )
महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिव

क्र. लेखा-८-कावि-३५८/९८
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी. दि. २९-४-९८

प्रति

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई
सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई (दोन प्रती)
मुख्यमंत्र्याचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रत:- १) तहसिलदार (सर्व)
२) उपविभागीय अधिकारी (सर्व)
३) विशेष भू संपादन अधिकारी (सर्व)
४) शाखा प्रमुख (सर्व) जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी [illegible]

**शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**क्रमांक एमएजी १०९५/ सीआर ४५/ आरोग्य-७**
**दिनांक १५ नोव्हेंबर, १९९७ चे सहपत्र**
**परिशिष्ठ - अ**

नियम :- १(१) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ नुसार जे शासकिय कर्मचारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत, अशा शासकिय कर्मचा-यांना हे अग्रिम मंजूर करण्यात येईल.

१(२) अस्थायी शासकिय कर्मचा-यांना दोन स्थायी कर्मचा-यांचा जामिन देणे आवश्यक आहे.

१(३) जर पति-पत्नी दोघेही शासकिय कर्मचारी असतील तर अग्रिम दोघांपैकी एकालाच मंजूर करण्यात येईल.

नियम २ :- हे अग्रिम फक्त महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ नुसार शासन निर्णय, दिनांक २९ एप्रिल, १९८५ च्या तरतुदीअन्वये ज्या उपकरणांच्या खरेदीवरील व औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल तेंव्हाच मंजूर करण्यात येईल.

नियम ३ :- शासकिय कर्मचा-याने आपल्या अग्रीमाच्या अर्जासोबत उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यासाठी लागणारा संभाव्य खर्च व शस्त्रक्रियेची आवश्यकता दर्शविणारे शासकिय रुग्णालयाचे अथवा संबंधित आजारासाठी मान्यता देण्यात आलेल्या रुग्णालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

नियम ४ :- हे अग्रिम रुपये ७५,००० च्या कमाल मर्यादेपर्यंत अथवा उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यावरील संभाव्य खर्च यापैकी जे कमी असेल तेवढया रकमेशी सिमित राहून मंजूर करण्यात येईल. सदर अग्रीमाची रक्कम संबंधित कर्मचा-यास प्रत्यक्ष शस्त्रक्रियेच्या दिनांकापूर्वी जास्तीत जास्त १५ दिवस अगोदर देण्यांत यावी.

नियम ५ :- नियमांचे योग्य पालन करुनच अग्रिम मंजूर करणे आणि ज्या कारणासाठी हे अग्रीम मंजूर झाले आहे, त्याच कारणासाठी व ज्या शासकिय अथवा शासनमान्य रुग्णालयात उपचार करण्यासाठी घेतले असेल तेथेच ते उपयोगात आणले गेले आहे, हे पाहण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

एच-1462(3,000-3-98)-3.

नियम ६ :- (अ) अग्रिम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत अग्रीमाची रक्कम वसूल करण्यात येईल अथवा शासकिय कर्मचाऱ्यांस देय असलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या रकमेतून समायोजित करण्यात येईल.

(ब) जर अग्रीमाची संपूर्ण रक्कम वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकामधून वसूल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकिय कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अथवा इतर देय रकमेतून एकाच हप्त्यात वसूल करण्यात येईल.

नियम ७ :- अग्रिम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वसूल झाले नाही तर त्यावर घरबांधणी अग्रीमासाठी आदेश (admissible) असलेल्या व्याजाच्या कमित कमी दराने व्याज आकारण्यात येईल.

नियम ८ :- वरील नियमानुसार अग्रिम मंजूर करण्याचे अधिकारी महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या परिशिष्ठ २ मध्ये नमूद केलेल्या विभाग प्रमुखांना राहतील.

मंगला सु. यादव
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव